शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०४१७/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०८.२०१७ हे रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक पोप्रमा-०४१७/प्र.क्र.२५०/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक ७ मे २०१८.

वाचा :-
१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.स्टे.-आंधळगांव-संगोपन-केंद्र-बांध-भंडारा/ ९२/ २०१७, दिनांक २२.०३.२०१७.
२) शासन ज्ञापन, गृह विभाग, क्रमांक पोप्रमा-०४१७/प्र.क्र.२५०/पोल-७, दिनांक ०८.०८.२०१७.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.स्टे.-आंधळगांव-संगोपन-केंद्र-बांध-भंडारा/ ९२/ २०१७, दिनांक २१.०९.२०१७.

प्रस्तावना.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी दिनांक २२.०३.२०१७ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, भंडारा, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, आंधळगांव, येथे महिला पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरिता बाल संगोपन केंद्राचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. त्या अनुसार, शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०४१७/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०८.२०१७, व्दारे रु.२५,९४,६४५/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

२. तथापि, पोलीस ठाणे, आंधळगांव, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांच्याकडे कार्यवाही सुरु आहे, असे पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे.

३. पूर्वोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.-

शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०४१७/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०८.२०१७, याव्दारे, रद्द करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०९१८१७४२०९२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.09 18:18:31 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
३) विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
४) पोलीस अधीक्षक, भंडारा.

प्रत:-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).